दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८३ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार, दि.८ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# ‘खून का बदला खून’, ‘ईट का जबाब पत्थर सें’ देशवासीयांची अपेक्षा होती, ती पूर्ण झाली

## एकनाथ शिंदेंनी मानले नरेंद्र मोदींचे आभार



**मुंबई (वृत्तसंस्था)– 'खून का बदला खून' आणि 'ईट का जबाब पत्थर सें' ही देशवासीयांची अपेक्षा होती. ती अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केली आहे. पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले आहे. याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे देशवासीयांची छाती अभिमानाने भरून गेली असल्याचे देखील ते म्हणाले.पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २५ भारतीय पर्यटकांमध्ये महाराष्ट्रातील पर्यटकांचा देखील समावेश होता. त्यामुळे या हल्ल्याचा बदला घेण्याची मागणी महाराष्ट्रातून जोर धरत होती. त्यातच आता भारतीय सैन्याच्या वतीने 'ऑपरेशन सिंदूर' पूर्ण करण्यात आले आहे. त्याबद्दल आता भारतीय सैन्याचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे महाराष्ट्रातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे. या संदर्भात एकनाथ शिंदे यांनी देखील न्याय मिळाला असल्याची भावना व्यक्त केली आहे.**

या संदर्भात एकनाथ शिंदे म्हणाले की, ऑपरेशनच्या सिंदूरच्या माध्यमातून जी कारवाई करण्यात आली, त्याचे मी अभिनंदन करतो. यासाठी देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन आणि आभार व्यक्त करत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये जे नागरिक पर्यटकांसाठी गेले होते, त्या महिला आणि मुलांसमोर त्यांच्या कुटुंबातील प्रमुखाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली. ही घटना मानवतेला कलंक असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.आतंकवादी आणि पाकिस्तानाला याचा 'ईट का जबाब पत्थर सें' देण्याची देशवासीयांची इच्छा आणि अपेक्षा होती. ती अपेक्षा पूर्ण झाली असून त्यांना न्याय मिळाला आहे. यामुळे सर्व देशवासीयांची छाती गर्वाने फुलली असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खूप खूप धन्यवाद आणि अभिनंदन करत असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. ते पाकिस्तानला सोडणार नाही, खून का बदला खून ने देत आहेत. संपूर्ण देश त्यांच्यासोबत उभा असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विनय गौडा सन्मानित

## १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत राज्यात प्रथम

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी संपूर्ण राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. त्या अनुषंगाने आज (दि.७) मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विनय गौडा यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचे मूल्यमापन महाराष्ट्र दिनी जाहीर करण्यात आले. यात उत्कृष्ट जिल्हाधिकारी कार्यालय श्रेणीत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने बाजी मारली. जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या नेतृत्वात ८४.२९ गुण मिळवत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला.

कार्यालयीन सुधारणा मोहिमेत अद्ययावत संकेतस्थळ, केंद्र शासनासोबत सुसंवाद, कार्यालयीन स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयीन सोयीसुविधा, कामकाजातील सुधारणा, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवाविषयक बाबी, सुकर जीवनमान, कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन आणि जिल्हा प्रशासनातर्फे राबविण्यात आलेले नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) मार्फत मूल्यमापन करण्यात आले होते. या सर्व निकषांवर परिपूर्ण उतरून चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय राज्यात सर्वोत्कृष्ठ ठरले.

### ऑपरेशन सिंदूर ठाण्यात जल्लोषाने साजरे

## भारतीय सैनिकांच्या शौर्य गाथेला ठाणेकरांचा सलाम

**ठाणे | प्रतिनिधी**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारतीय लष्कराने दिलेल्या सडेतोड प्रत्युत्तरामुळे ऑपरेशन सिंदूर यशस्वी ठरले असून, देशभरात या वीरतेचा जल्लोष साजरा केला जात आहे. या शौर्यगाथेचा अभिमान ठाणेकरांनीही व्यक्त केला.

ठाण्याचे खासदार नरेश मस्के यांनी पेढे वाटून, फटाके वाजवून आणि हमसे जो टकराएगा, वो मिट्टी में मिल जाएगा!, भारत माता की जय!, वंदे मातरम्! आणि इन्कलाब जिंदाबाद! अशा जोरदार घोषणांनी भारतीय लष्कराच्या पराक्रमाला सलाम केला.यावेळी पाकिस्तानचा झेंडा जाळण्यात येऊन, भारताच्या विरोधात जाणाऱ्यांना यापुढे अशाच प्रकारे प्रत्युत्तर दिलं जाईल, असा कडक संदेशही देण्यात आला.



या यशस्वी ऑपरेशनबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि तिन्ही लष्करप्रमुखांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या निर्णायक नेतृत्वामुळे हे अभियान यशस्वी झाले, असे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.याशिवाय, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावतीनेही भारतीय जवानांचे अभिनंदन करण्यात आले. संपूर्ण भारत देशाच्या सुरक्षेसाठी लढणाऱ्या जवानांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही खासदार मस्के यांनी दिली.


## पाकी दहशतवादा विरुध्द सर्जिकल स्ट्राईक

### शक्तिशाली सैन्य सज्जतेचा परिचय–हंसराज अहीर

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा ‘‘ऑपरेशन सिंदुर’’ सर्जिकल स्ट्राईक करुन भारताने बदला घेत पाकिस्तान व दहशतवादी संघटनांना सडेतोड उत्तर दिल्याबद्दल पुर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार व तिन्ही सैन्यदलांचे अभिंनदन करुन याविशेष कामगीरीवर गर्व व्यक्त केला आहे..

कोटली, मुज्जफराबाद व बहावलपुर सह ९ आतंकी तळांना लक्ष्य करीत एअर स्ट्राईक द्वारे शेकडो आतंकवाद्यांचा खातमा करुन भारताने आपल्या भगिनींच्या पुसल्या गेलेल्या कुंकवाचा हिशेब चुकता केला. दहशतवादी संघटनांनी पुन्हा पुन्हा भारताच्या सीमांकडे करड्या नजरेने बघण्याचे धाडस करु नये अन्यथा जगाच्या नकाशावरुनच पुसुन टाकू हा पाकिस्तानला दि. ०७ मे रोजी पहाटे केलेल्या सर्जिकल स्ट्राईक मधुन दिलेला थेट इशाराच आहे.



‘‘देश प्रथम’’ ही मा. नरेंद्र मोदीजींची निती व स्पष्ट भुमिका आहे. देशाविरुद्ध रचल्या जाणारे कोणतेही कट कारस्थान सहन केले जाणार नाही, त्याची किंमत वसुल करण्याची धमक मोदी सरकारची आहे. आमचे सैन्यदल यासाठी सक्षम आहेत. हेच या सर्जिकल स्ट्राईक ने पुन्हा एकदा दाखवून दिले. अत्यंत नियोजनबध्द व मानवीय दृश्टीकोनाचा परिचय देत पाकिस्तानी नागरीक व तेथील सैन्यदलास इजा न पोहचविता भारताने दहशतवादाविरुध्द केलेला सर्जिकल स्ट्राईक हा भारताचा ऐतिहासिक विजय असल्याचे पुर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री अहीर यांनी म्हटले आहे.

### सरकारी नोकरीचं गाजर दाखवून महिलांची फसवणूक

## इंदूरच्या दिशाचा ३३ लाखांचा घोटाळा शिरुर पोलिसांनी केली धडाकेबाज कारवाई!

**शिरूर | रमेश बनसोडे**

सरकारी नोकरी या शब्दाने कित्येकांचे स्वप्न उंचावतं आणि हाच भावनिक पाया साधून एक महिलेने अनेकांना चक्क ३३ लाख ४६ हजार रुपयांनी गंडवले. इंदूर (म.प्र.) येथील दिशा सिंह या आरोपी महिलेने सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत पुणे जिल्ह्यासह विविध ठिकाणच्या महिलांकडून कोट्यवधी रुपये उकळले. अखेर शिरुर पोलिसांनी तिच्या मुसक्या आवळत न्यायालात हजर केले. सदर प्रकरण ऑगस्ट २०२३ ते एप्रिल २०२४ या कालावधीत घडले. दिशा सिंह हिने स्वतःला मोठ्या अधिकाऱ्यांची ओळख असलेली असल्याचे भासवत महिलांना सरकारी नोकऱ्यांचे आमिष दाखवले. रेल्वे, मंत्रालय, शिक्षण विभागात जागा आहेत, तुमचा नंबर लावतो, असे सांगून विश्वास संपादन केला. तिच्या बोलण्याला बळी पडलेल्या महिलांनी लाखो रुपयांचे व्यवहार रोख आणि ऑनलाईन पद्धतीने केले. एकूण ३३,४६,५०० रुपयांची रक्कम तिने उचलली. मात्र, नोकरी तर मिळाली नाहीच, पण दिशा सिंह ही गायब झाली.

शिरुर पोलिस स्टेशनमध्ये याप्रकरणी फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक शिवाजी बकनर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला. ठिकठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेज, बँक व्यवहार, कॉल डिटेल्स यांचा तपास करत शेवटी दिशा ही इंदूरमध्ये असल्याचे निष्पन्न झाले.



शिरुर पोलिसांनी इंदूर गाठून स्थानिक पोलिसांच्या मदतीने विशेष ऑपरेशन राबवले आणि आरोपीला अटक केली. यामध्ये महिला पोलीस अंमलदार सविता होळकर यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक रमेश चोपडे यांचे मोलाचे योगदान होते. आरोपीला पुण्यात आणून न्यायालयात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

या गुन्ह्याच्या गंभीरतेमुळे पोलीस अधीक्षक संदीप कर्णिक, अपर पोलीस अधीक्षक दशरथ देशमुख, उपविभागीय अधिकारी प्रशांत खैरनार यांनी स्वतः लक्ष घालून तपास गतीमान केला. ही महिला अनेक गुन्ह्यांमध्ये सामील असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून तिच्या पार्श्वभूमीचा तपास सुरू आहे.या प्रकरणातून जनतेने आणि विशेषतः महिला वर्गाने धडा घेण्याची गरज आहे. सरकारी नोकरी लावून देतो म्हणणारे अनेक फसवे लोक समाजात फिरत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोणत्याही मध्यस्थाच्या माध्यमातून नोकरी मिळते, अशा भूलथापांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार धाकटी डहाणू येथील वादळग्रस्त भागाची पाहणी



**पालघर | प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील धाकटी डहाणू येथे ६ मे २०२५ रोजी आलेल्या वादळामुळे सुमारे ४० ते ५० बोटी आणि १० ते १२ घरांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार व मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी (डहाणू) महेश सागर, दिनेश पाटील, उपआयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, तसेच डहाणू तालुक्याचे तहसीलदार सुनील कोळी यांनी घटनास्थळी भेट देत नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

यावेळी त्यांनी प्रत्यक्ष मच्छीमार बांधवांची भेट घेऊन त्यांच्या नुकसानीचा आढावा घेतला. शासनातर्फे नियमानुसार योग्य ती मदत दिली जाईल, असे आश्वासन उपजिल्हाधिकारी महेश सागर यांनी दिले.

नुकसानीचे पंचनामे सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग आणि महसूल प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सुरू आहेत.

## आ.देवराव भोंगळे यांची मध्यस्ती फळाला; पालगाव रस्ता आंदोलनाला यश

# अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने स्वीकारल्या मागण्या ३० मे पर्यंत काम सुरु करण्याचे लेखी आश्वासन

## कामगार बांधवांच्याही समस्या निकाली निघणार–अल्ट्राटेक नरमले

**कोरपना । प्रतिनिधी**

मागील तिन दिवसांपासून सुरु असलेल्या पालगाव (ता. कोरपना) येथील ग्रामस्थांच्या ठिय्या आंदोलनापुढे अखेर अल्ट्राटेक सिमेंट कंपनी प्रशासन नमले आहे. आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांच्या रस्त्याच्या मागणीला यश आले असून, येत्या ३० मे पर्यंत पालगाव–मुख्य रस्ता कामाला सुरुवात करण्याचे लेखी आश्वासन कंपनी प्रशासनाने लेखी पत्रात दिले आहे. रखरखत्या उन्हात आणि अवकाळी पावसात तीन दिवस चाललेल्या या आंदोलनात राजूरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांनी सक्रिय सहभाग घेत ग्रामस्थांच्या मागण्यांना बळ दिले होते.





कोरपना तालुक्यातील पालगाव येथील ग्रामस्थ मागील अनेक वर्षांपासून अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या आवाळपूर प्लान्टकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुरुस्तीची व डांबरीकरणाची मागणी करत होते. या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने ग्रामस्थांना विशेषतः विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. अनेकदा निवेदने देऊनही अल्ट्राटेक कडून दखल घेतली जात नसल्याने अखेर ग्रामस्थांनी सोमवार, ५ मे २०२५ पासून कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन सुरु केले. या आंदोलनाची माहिती मिळताच स्थानिक आमदार देवराव भोंगळे यांनी लागलीच आंदोलन स्थळ गाठून आंदोलनकर्त्यांसह कंपनीविरुद्ध हुंकार फुंकला. त्यांनी रात्री कार्यकर्त्यांसह तेथेच सामुहिक भोजनही केला.

मंगळवारी, दि. ६ मे रोजी आंदोलनस्थळी महिला–पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये कामगारांचाही समावेश होता. कंपनी प्रशासनाच्या विरोधात कामगारांमध्येही असंतोष होता. आमदार देवराव भोंगळे यांनी कोणत्याही कामगार बांधवांनी कामावर न जाता आपल्या न्याय्य मागण्यांसह आंदोलनास पाठिंबा द्यावा अशी विनंती केली, त्यानुसार कामगारांनी कामावर न जाऊन या आंदोलनाला पाठिंबा दिला. कंपनी प्रशासनाला आपल्या मागण्या लेखी स्वरूपात देत आमदार देवराव भोंगळे यांचे नेतृत्वात कंपनी प्रशासनाशी चर्चा केली. ग्रामस्थांनी आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार केला. चर्चा अर्ध्यावर आल्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मागण्यांवर होकार दर्शविला. परंतू पुन्हा घुमजाव करीत मागण्यांसंदर्भात नकारात्मकता दर्शविली.

परंतू आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी मागे न हटण्याची भुमिका घेतली. तीन दिवसांच्या आंदोलनाची तीव्रता आणि आमदार भोंगळे यांची मध्यस्थी लक्षात घेऊन अखेर अल्ट्राटेक सिमेंट कंपनी प्रशासनाने नरमाईची भूमिका घेतली. आज (बुधवारी) सायंकाळी कंपनीचे अधिकारी आणि आमदार देवराव भोंगळे व आंदोलक ग्रामस्थ यांच्यात झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. त्यानंतर पालगाव रस्त्याच्या कामाला येत्या ३० मे २०२५ पर्यंत प्रत्यक्ष सुरुवात केली जाईल तसेच कामगारांच्याही न्याय्य मागण्या निकाली काढू असे लेखी आश्वासन अल्ट्राटेक सिमेंट कंपनी प्रशासनाने दिले. या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आपले तीन दिवसांपासून सुरु असलेले ठिय्या आंदोलन मागे घेतले. या यशस्वी आंदोलनामुळे पालगाव ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. आमदार देवराव भोंगळे यांनी ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि शांततापूर्ण आंदोलनाचे कौतुक केले तसेच कंपनी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. आंदोलनाच्या यशस्वी सांगतेनंतर आमदार देवराव भोंगळे यांनी सर्वांसह दुचाकीने पालगाव येथे जाऊन आनंद व्यक्त केला. यावेळी त्यांचेसमवेत उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, नायब तहसीलदार प्रवीण चिडे, ठाणेदार शिवाजी कदम, पालगावचे सरपंच अरूण रागीट, अल्ट्राटेकचे व्यवस्थापक नमित मिश्रा, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय मुसळे, तालुका महामंत्री सतीश उपलेंचवार, गडचांदूर शहर अध्यक्ष अरविंद डोहे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने, नांदा शहर अध्यक्ष संजय नित, भाजपा महिला मोर्चा जिल्हा महामंत्री विजयालक्ष्मी डोहे, संदीप शेरकी, सुनील उरकुडे, वामन तुराणकर, शहर महामंत्री रवी बंडीवार, कैलाश ताकसांडे, पुरूषोत्तम निब्रड, युवा मोर्चा तालुका महामंत्री विशाल अहिरकर, दिनेश ढेंगळे, सचिन आस्वले, रोहन काकडे, पवनदीप यादव, हितेश चव्हाण, अमोल गोरे, नरेंद्र मडावी, अनिल आत्राम, संदीप आंबटकर, आकाश रागीट, प्रकाश कुमरे, जतिन राठोड, अल्ट्राटेकचे एन. डी. तिवारी, सवदीप घोष, सतीश मिश्रा, सुराणा यांचेसह पालगाव वासीयांची मोठी उपस्थिती होती.

## सुधाताई बापूराव देशमुख (बेलोरकर) यांचे निधन

**वरोरा । प्रतिनिधी**



आनंदवन येथील रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्ते प्रशांत देशमुख यांच्या मातोश्री सुधाताई बापूराव देशमुख (बेलोरकर) (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

बुधवार ७ मे रोजी दुपारी ३.३० वाजता आनंदवन येथील श्रद्धावन मोक्षधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे आणि आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे

## जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार धाकटी डहाणू येथील वादळग्रस्त भागाची पाहणी

**पालघर । प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील धाकटी डहाणू येथे ६ मे २०२५ रोजी आलेल्या वादळामुळे सुमारे ४० ते ५० बोटी आणि १० ते १२ घरांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार व मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी (डहाणू) महेश सागर, दिनेश पाटील, उपआयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, तसेच डहाणू तालुक्याचे तहसीलदार सुनील कोळी यांनी घटनास्थळी भेट देत नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष मच्छीमार बांधवांची भेट घेऊन त्यांच्या नुकसानीचा आढावा घेतला. शासनातर्फे नियमानुसार योग्य ती मदत दिली जाईल, असे आश्वासन उपजिल्हाधिकारी महेश सागर यांनी दिले.नुकसानीचे पंचनामे सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग आणि महसूल प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सुरू आहेत.



## गणेशपूर (जामडी) पाझर तलावात पाच ते सहा टन मासे मृत्यूमुखी पडले

### पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पिशोर । जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील गणेशपूर लघु सिंचन प्रकल्पातील पाण्यात गेल्या चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात मासे मृत्यूमुखी पडत असून, आतापर्यंत अंदाजे पाच ते सहा टन मासांचा मृत्यू झाला आहे. माशांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. धरणाच्या चारही बाजूंनी मृत माशांचा खच जमा झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या वर्षी परतीच्या पावसामुळे चिंचोली लिंबाजी परिसरात ऑक्टोबर महिन्यात गणेशपूर लघु सिंचन प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला होता. याच प्रकल्पात आदर्श वसाहत, उंबरखेड येथील मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या वतीने नोव्हेंबर महिन्यात पाच कोटी विविध जातींच्या मत्स्यबीजांचे सोडपात करण्यात आले होते. मत्स्यबीज वाढीसाठी संस्थेने मोठा खर्च केला होता. या मत्स्यव्यवसायावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे.

मात्र २ मेपासून प्रकल्पातील मासे अचानक मृत्यूमुखी पडू लागले असून, हे प्रमाण दररोज वाढत आहे. त्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य विभाग, महसूल विभाग, सिंचन विभाग तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने घटनास्थळी पाहणी करण्यात आली असून पाण्याचे नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तपासणी अहवाल प्राप्त होईपर्यंत नागरिकांनी या प्रकल्पाचे पाणी पिऊ नये व आपल्या गुरांना पाजू नये, अशा सूचना ग्रामपंचायतीकडून देण्यात आल्या आहेत. घटनास्थळी चेअरमन नारायण पवार, जामडीचे सरपंच दिनकर खरात, ग्रामसेवक दत्ता निकम, राष्ट्रवादी अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष नवाब शेख, सामाजिक कार्यकर्ते तातेराव भुजंग, तलाठी घोलप यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## पदवीधर मतदार यादीत नाव नोंदणीसाठी उमेदवार व संघटनांनी घेतली आक्रमक भूमिका

### छात्रांमध्ये जनजागृतीसाठी ‘ऑनलाइन रजिस्ट्रेशन शिबिरे’ आणि शाळा–महाविद्यालयात दौरे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी मतदार नोंदणीस सुरूवात झाली असून, ही प्रक्रिया ६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे. यासाठी इच्छुक उमेदवार व राजकीय संघटनांनी आक्रमक भूमिका घेतलेली दिसून येत आहे. युवक आणि विशेषतः अंतिम वर्षाला शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करत, ऑनलाइन फॉर्म भरण्याचे शिबिरे आयोजित केली जात आहेत.



पदवीधर मतदारसंघामध्ये फक्त पदवीधर व्यक्तीच मतदार म्हणून नोंदणी करू शकतात. यासाठी त्यांना नोंदणीच्या वेळेस पदवी प्रमाणपत्र सादर करावे लागते. यंदा ऑनलाईन नोंदणीला विशेष प्रतिसाद मिळत असून, उमेदवार व त्यांचे समर्थक संघटनांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून, तसेच महाविद्यालयांमध्ये जाऊन प्रत्यक्ष जनजागृती सुरू केली आहे.

चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, नागपूर ग्रामीण व गडचिरोली या पाच जिल्ह्यांत पदवीधर मतदारसंघ आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या परिसरात मतदार नोंदणी अभियान राबवले जात आहे. विद्यार्थी आणि युवा पदवीधरांना आकर्षित करण्यासाठी, ढठ कोड स्कॅन करून ऑनलाईन फॉर्म भरता येईल, अशा सुविधा दिल्या जात आहेत. काही संघटनांनी तर त्यांच्या कार्यालयातच ऑनलाईन नोंदणी केंद्रे सुरू केली आहेत.

यंदा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत नव्या चेहऱ्यांची चर्चा असून, अनेक इच्छुकांनी आधीपासूनच जनसंपर्क सुरू केला आहे. मतदारसंघाचा मोठा भाग नागपूर ग्रामीण आणि वर्धा जिल्ह्यांत येतो. त्यामुळे या भागात विशेष लक्ष दिले जात आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील उमेदवार या निवडणुकीसाठी जोरदार तयारीला लागले आहेत.

## परभणी जिल्ह्यात पिकविमा प्रश्नावर उच्चस्तरीय बैठक; शेतकऱ्यांच्या आक्रोशाची घेतली दखल

**परभणी । प्रतिनिधी**

खरीप २०२४ च्या पिकविमा प्रश्नावर परभणी जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांच्या आक्रोशाला अखेर दखल मिळाली असून आज सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर यांनी ऑनलाइन उपस्थिती दर्शवली, तर जिल्हाधिकारी रघुनाथराव गावडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.



या बैठकीस आमदार राजेश दादा विटेकर, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार डॉ. राहुल पाटील, पिकविमा चळवळीचे प्रमुख समन्वयक हेमचंद्र शिंदे, डॉ. सुभाष कदम, विशंभर गोरवे, गोविंद लांडगे, ॲड. माधुरीताई क्षीरसागर यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक चव्हाण व तालुका कृषी अधिकारी, तसेच आयसीसी लोम्बार्ड कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फक्त ६९०० रुपये प्रतिहेक्टरचा विमा दिला गेला असून, तो अत्यंत तुटपुंजा असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. अनेक शेतकऱ्यांनी वेळेत तक्रारी करून, पंचनामे करवूनही त्यांना विमा लाभ मिळालेला नाही. काही मोजक्या शेतकऱ्यांना मात्र वैयक्तिक तक्रारीवर विमा दिला गेला, त्यामुळे असंतोष वाढला आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाभरात शेतकऱ्यांमध्ये असंतोष असून, विविध ठिकाणी आंदोलने सुरू झाली आहेत. या वाढत्या नाराजीची दखल घेत, आजची ही बैठक बोलावण्यात आली. बैठकीत शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या गेल्या असून, पिकविमा वितरणात पारदर्शकता आणण्यावर भर देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

## भद्रावती येथे १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्गाचे आयोजन

### विवेकानंद महाविद्यालयाचा उपक्रम

**भद्रावती । प्रतिनिधी**

बारावीच्या परीक्षांचा नुकताच निकाल लागलेला आहे.अथक प्रयत्न करूनही ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेत अपयश आले आहे. अशा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी येत्या जुन, जुलै महिन्यात नागपूर बोर्ड पुन्हा परीक्षेचे आयोजन करणार आहे. विद्यार्थी हित व सामाजिक बांधिलकी लक्षात घेत स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात १२वी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वच विषयांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी निःशुल्क मार्गदर्शनपर शिकवणी वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १५ मे पासून स्थानिक विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या निःशुल्क मार्गदर्शनपर वर्गाचा भद्रावती शहर व परिसरातील १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. सुधीर आस्टुनकर यांनी केले आहे. संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे तथा सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात आयोजित या विशेष मार्गदर्शनपर शिकवणी वर्गात मार्गदर्शन घेऊन यशस्वी होता येईल. अपरिहार्य कारणामुळे यशस्वी होता आले नाही. त्यांनी निराश होऊ नये. पुन्हा नव्याने तयारी करून यशस्वी होण्याची संधी त्यांना लाभणार आहे. सामाजिक बांधिलकी व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत महाविद्यालयाने या उपक्रमाचे आयोजन केले. इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयात आधी नोंदणी करून घ्यावी व या वर्गांचा निःशुल्क लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाण्याच्या समस्येसाठी सिंदी रेल्वे नगरपरिषदेला घागर मोर्चा–नागरिकांचा आक्रमक पवित्रा

## सिंदी रेल्वे शहरात पिण्याचे पाणी मिळते आठवड्यातून एक वेळा

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

सिंदी रेल्वे शहरात आठवड्यातून फक्त एकदाच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो, या भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेतृत्वात भव्य घागर मोर्चा नगरपरिषद कार्यालयावर काढण्यात आला. या आंदोलनाला राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांचाही पाठिंबा लाभला आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

३ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत एक आठवड्यात सुधारणा करण्याची मागणी केली होती. परंतु पाणीपुरवठा पूर्ववत न झाल्याने नागरिक संतप्त झाले. सध्या शहरात पाच दिवसांनंतर पाणीपुरवठा केला जातो आणि तोही फक्त दीड तासासाठी. शहरातील ८०% नळांना ताट्या नाहीत, त्यामुळे सुमारे ३०% पाणी वाया जाते.पूर्वी वाकसूर येथे ३० हॉर्सपॉवरच्या मोटरपंपांमुळे टाक्या ७–८ तासांत भरायच्या आणि दोन दिवसाआड पाणी मिळायचे. परंतु २०१९ मध्ये जीवन प्राधिकरणाने २५ हॉर्सपॉवरच्या मोटरपंप बसवण्याचे आदेश दिल्यापासून टाक्या भरायला १३–१४ तास लागतात. त्यामुळे आता फक्त पाच दिवसांनंतर पाणीपुरवठा होतो.

वाकसूर डोहात पाण्याचा मुबलक साठा असला तरी विहीर व डोहात साचलेली रेती आणि गाळ यामुळे पाणी साठत नाही. योग्य नाली तयार केल्यास विहीरीत पाणी साठवणे शक्य होईल, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.या आंदोलनानंतर मुख्याधिकारी यांनी तीन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. मात्र प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास अधिक आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा दिला.या मोर्चामध्ये सुनिल राऊत, अतुल वांदिले, महेश झोटींग पाटील, सुधाकर खेडकर, सुनिता कलोडे, गंगाधर कलोडे, प्रकाश डफ, आशिष देवतळे, सुनील डोंगरे, सचिन लांबट, तुषार हिंगणेकर, बबलु खान आदींसह शेकडो कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले.



# महावाचन उत्सव–२०२४ मध्ये भारत विद्यालयाच्या पूर्वाई सुपारेला तृतीय क्रमांक

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाच्या महावाचन उत्सव – २०२४ या राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या सहवासात आणण्याच्या या मोहिमेत भारत विद्यालय, हिंगणघाटच्या कु. पूर्वाई निलेश सुपारे हिने आपल्या लेखनकौशल्यातून यश संपादन करत तालुकास्तरावर तृतीय क्रमांक पटकावला.गट ‘ब’ (वर्ग ६ वी ते ८ वी) मध्ये झालेल्या लेखन मूल्यांकनात हिंगणघाट तालुक्यातील विविध शाळांमधून स्पर्धक सहभागी झाले होते. त्यामध्ये भारत विद्यालयाच्या इयत्ता ६ वीतील पूर्वाई सुपारे हिने उल्लेखनीय कामगिरी केली.




या यशाच्या निमित्ताने गटशिक्षणाधिकारी अरविंद राठोड यांच्या हस्ते तिला सात पुस्तकांचा विशेष गौरव संच प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी विषयतज्ज्ञ कविता घोडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.पूर्वाईच्या या यशाबद्दल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी हिंगणघाट चे अध्यक्ष गोकुलदासजी राठी, उपाध्यक्ष श्यामभाऊ भीमनवार, सचिव रमेश धारकर, शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले, मनीषा कोंडावार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.पूर्वाईच्या या कामगिरीमुळे शाळेचा नावलौकिक वाढला असून विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे.

# आठवडी बाजार परिसरात नाली जाम न.प.आणि सफाई विभाग झोपेतच

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मून**

धामणगाव रेल्वे येथील आठवडी बाजार परिसरात नाल्या तुंबल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. नगर परिषद व सफाई विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नियमितपणे नाली सफाई न झाल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या नाल्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती झपाट्याने वाढत असून, डेंग्यू व मलेरिया सारख्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध नागरिक या घातक रोगांच्या धोक्याच्या छायेत आहेत.





स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सफाई कर्मचारी वेळेवर येत नाहीत, आणि आले तरी केवळ नावापुरते काम करून निघून जातात. अनेक वेळा तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी जर ही स्थिती बदलली नाही, तर आरोग्याचा मोठा प्रश्न उभा राहू शकतो, अशी चिंता नागरिक व्यक्त करत आहेत. आता तरी नगर परिषद आणि संबंधित अधिकारी जागे होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# वर्धा नदीवरील अपूर्ण पुलामुळे तांबा गावातील नागरिक त्रस्त–काम सुरू करण्याची मागणी जोरात

**वर्धा । प्रतिनिधी**

बाभूळगाव तहसीलमधील तांबा व देवळी तहसीलमधील तांबा हे दोन गावांना जोडणारा पूल वर्धा नदीवर बांधण्यात येत आहे. मात्र या पुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडलेले असून अद्याप प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली नाही.

या पुलावर आतापर्यंत दोन ते तीन अपघात झाले असून, नागरिकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. शेतकऱ्यांसह विद्यार्थ्यांना व रोजंदारी करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

स्थानिक ग्रामस्थ व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शाखाध्यक्ष प्रमोद मडावी यांनी प्रशासनाकडे या अपूर्ण पुलाचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी काही वेळा पाहणी केली असली तरी प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, पूल पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी दोन्ही गावांतील ग्रामस्थांकडून होत आहे.



### ग्रामस्थांची ठाम भूमिका

**तांबा गावातील नागरिकांना दैनंदिन प्रवासात अडचणींचा सामना करावा लागतो. अपूर्ण पुलामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाणेही धोकादायक झाले आहे.पावसाळ्यात नदीला पूर येतो, तेव्हा संपूर्ण संपर्क तुटतो.**

# टपाल सेवेच्या माध्यमातून ज्ञानपोस्ट सेवा सुरु

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारत सरकारने टपाल सेवेच्या माध्यमातून ज्ञान पोस्ट या सेवेची सुरुवात केली असून अहिल्याननगर प्रधान डाकघर येथे ही सुविधा उपलब्ध झाली असल्याचे डाकघरचे वरिष्ठ अधीक्षक यांनी कळविले आहे.

या उपक्रमाद्वारे टपाल विभाग सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक महत्वाच्या शिक्षणाला प्रोत्साहन देईल. शैक्षणिक पुस्तके, स्पर्धा परीक्षांच्या तयारीशी संबंधित अभ्यास साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधित महत्वाची पुस्तके पाठविण्यासाठी विशेष सेवा प्रदान करण्यात येईल. या सेवेअंतर्गत ट्रॅक अँड ट्रेस सुविधा उपलब्ध असणार आहे. रजिस्ट्रेशन, इंन्शुरन्स, वितरणाचा पुरावा अशा मूल्यवर्धित सेवांचाही समावेश असणार आहे. पुस्तके असलेल्या पॅकेटवर ज्ञानपोस्ट असे चिन्हांकित केले जावे. पॅकेटमध्ये ठेवलेल्या प्रत्येक पुस्तकावर मुद्रक किंवा प्रकाशकाचे नाव असावे. पुस्तकांमध्ये आकस्मिक घोषणा किंवा पुस्तकांची यादी व्यतिरिक्त कोणतीही जाहिरात असून नये. या उत्पादनाद्वारे व्यावसायिक किंवा व्यावसायिक स्वरुपाचे कोणतेहही पुस्तक पाठवले जाणार नाही.

ज्ञानपोस्ट पाठविण्यासाठी ३०० ग्रॅमपर्यंत २० रुपये, ३०१ ते ५०० ग्रॅम २५ रुपये, ५०१ ते एक हजार ग्रॅम ३५ रुपये, एक हजार एक ते दोन हजार ग्रॅम ५० रुपये, दोन हजार एक ते ३ हजार ग्रॅम ६५ रुपये तीन हजार एक ते चार हजार ग्रॅम ८० रुपये व चार हजार एक ते पाच हजार ग्रॅमसाठी १०० रुपये असे दर राहणार आहेत.

# ओक परिवाराचा गोबर गॅस प्लांट स्वावलंबनाचा अमृत महोत्सव

## नाचणगावमध्ये ५० वर्षे अखंडपणे सुरू असलेला गोबर गॅस प्लांट ठरतोय पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोताचा आदर्श



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्वावलंबन, पर्यावरणपूरक ऊर्जा आणि सेंद्रिय शेती याचे जिवंत उदाहरण म्हणजे नाचणगाव येथील ओक कुटुंबाचा गोबर गॅस प्लांट. १९७५ साली सुरू झालेला हा प्लांट आजही कार्यरत असून त्याला यंदा ५० वर्षे पूर्ण होत आहेत.स्व. गोविंदराव कृष्णराव ओक हे त्या काळात मिसा बंदी होते. त्याच वर्षी दिनकरराव ओक यांनी खादी ग्रामोद्योग वर्धा यांच्या योजनेतून गोबर गॅस प्लांट सुरू केला. नाचणगावात तेव्हा सुमारे २५–३० प्लांट उभारण्यात आले होते, पण काळाच्या ओघात सर्व बंद झाले. मात्र ओक कुटुंबाचा प्लांट आजही सुरू आहे. दैनंदिन चार टोपली शेण, आवश्यक पाणी आणि नियमित देखभालीच्या माध्यमातून प्लांट प्रभावीपणे चालवला जातो. यामधून निर्माण होणारी स्लरी शेणखत म्हणून वापरली जाते, जी शेतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.गाईच्या शेणाचा उपयोग बायोगॅस निर्मितीसाठी, स्लरीचा शेतीत वापर आणि त्यातून मिळणारे भरघोस उत्पन्न – यामुळे ओक कुटुंबाने सिलेंडर गॅस व लाकूड यावर होणारा खर्च टाळत इंधनाचा नैसर्गिक पर्याय साकारला आहे. यामुळे घरातील प्रदूषण टळते आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना मिळते.

**गोबर गॅस – ग्रामविकासासाठी प्रभावी पर्याय**

गोबर गॅस प्लांट हे ऑक्सिजनशिवाय शेण कुजवून निर्माण होणाऱ्या मिथेन वायूचा उपयोग करून इंधन तयार करणारे यंत्र आहे. त्याचे तीन मुख्य प्रकार –

Fixed Dome (स्थिर घुमट)
Floating Drum (तरंगता टाकी)
Dayanand Model (दिनबंधु मॉडेल)

यांच्या सहाय्याने लहान ते मोठ्या पातळीवर ऊर्जा निर्मिती शक्य आहे.

प्लांटची किंमत ३९,०००/– पासून सुरू होते. शासनाकडून अनुदानाची सुविधाही उपलब्ध आहे. पन्नास वर्षांपासून टिकवून ठेवलेला हा प्लांट हे ग्रामीण भागासाठी ऊर्जा स्वावलंबनाचे प्रेरणास्थान आहे. ओक कुटुंबाने जतन केलेला हा वारसा ही काळाची गरज असून त्यांच्या कार्याला ग्रामविकासाच्या दृष्टीने सलाम करावा लागेल.

## रामदासजी आंबटकर : संघटन समर्पित नेतृत्वाला श्रद्धांजली

# पुलगावात भावनिक वातावरणात श्रद्धांजली सभा; विविध पक्षांचे मान्यवर सहभागी

## रामदासजी आंबटकर संघटन समर्पित नेतृत्व–अविनाश भोपे

**पुलगाव । प्रतिनिधी**

डॉ. रामदासजी आंबटकर हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर संघटन समर्पित नेतृत्व होते. विद्यार्थी परिषद, शिक्षण मंच, भाजप व संघ परिवारातील विविध संघटनांची उभारणी आणि बळकटीसाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, असे गौरवोद्गार मातृसेवा परिवाराचे संस्थापक अविनाश भोपे यांनी काढले.




डॉ. रामदासजी आंबटकर मित्र परिवारातर्फे मातृसेवा सभागृह, पुलगाव येथे आयोजित श्रद्धांजली सभेला ते संबोधित करत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी रंगलाल केजडीवाल कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक नुरसिंग जाधव होते.भारतीय जनता पार्टीचे ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते म्हणाले, रामदासजी हे चालते बोलते प्रशिक्षण केंद्र होते. त्यांनी हजारो कार्यकर्त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवले. सामान्य कार्यकर्त्याला नेता बनवण्याचे सामर्थ्य त्यांच्या कृतीत होते. त्यांनी तयार केलेल्या नेतृत्व फळीमुळे विदर्भाचा राजकीय चेहरा घडला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. रामदासजी आंबटकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. ‘मातृ मंदिर का समर्पित दीप मै’ हे भावगीत हितेश पैकीने सादर केले. कार्यक्रमाचे संचालन मंगेश झाडे यांनी केले. यावेळी सामूहिक शांती मंत्र आणि पुष्पांजली अर्पणाद्वारे सर्व उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली.या शोकसभेला विविध पक्षांचे व संघटनांचे मान्यवर उपस्थित होते. काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रमेशराव सावरकर, शिवसेना (शिंदे गट) नेते प्रशांत शहागडकर, विवेकानंद सहकारी संस्था व शिक्षक समितीचे अजयराव बोबडे, संस्कार भारतीचे सुबोध चचाने, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सचिन मुळे, शिक्षणतज्ज्ञ नितीन रावेकर, भाजपा महिला आघाडीच्या संगीता देशमुख, तसेच पुलगावमधील विविध सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाची परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी क्यूएस रँकिंग (जगभरातील २०० च्या आत विद्यापीठांची क्रमवारी) अंतर्गत परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये सन २०२५–२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी शाखानिहाय, अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी www.obcbahujankalyan.maharashtra.gov.in qH$dm https:// .obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून अर्ज डाऊनलोड करावा तसेच परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रासह १७ मे २०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत सक्षम किंवा पोस्टाने सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चंद्रपूर येथे दोन प्रतित सादर करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक आशा कवाडे यांनी केले आहे.

# वैजापूर तालुक्यात खरीप हंगाम पूर्वतयारी कार्यशाळा संपन्न

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

तालुका कृषी विभागाच्या वतीने कृषी महाविद्यालय खंडाळा येथे खरीप हंगामपूर्व तयारीसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी अशोक बिनगे यांनी केले. त्यांनी खरीप हंगामात राबविण्यात येणाऱ्या विविध मोहिमांविषयी माहिती दिली.कार्यशाळेत कृषी विज्ञान केंद्र गांधिलीचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुखासे यांनी कापूस, मका आणि सोयाबीन या प्रमुख पिकांच्या लागवड तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले. पाणी फाउंडेशनचे अविनाश पोळ यांचे डिजिटल शेती शाळेविषयी ऑनलाइन मार्गदर्शन ऐकविण्यात आले.कृषी पर्यवेक्षक माधव गांगुर्डे यांनी खत व्यवस्थापन, ठिबक सिंचनाद्वारे खतांचा वापर आणि पीक स्पर्धेच्या संकल्पनेवर मार्गदर्शन केले. दत्ता पुंड यांनी मल्चिंग तंत्रावर आधारित कांदा लागवडीच्या पद्धती व अपेक्षित उत्पादनाविषयी माहिती दिली.

मंडळ कृषी अधिकारी साळवे यांनी सेंद्रिय शेतीवर, घोडके यांनी महाडीबीटी योजनांवर तर श्याम पाटील यांनी तूर लागवड तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले. रवि उराडे यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना याविषयी माहिती दिली.कार्यक्रमाच्या शेवटी कृषी सहाय्यक मीना पंडित व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोयाबीन उगम क्षमता चाचणी, उर्मिला जेजुरकर यांनी फेरोमन ट्रॅपचे प्रात्यक्षिक तर कुचेकर यांनी बीज प्रक्रिया प्रत्यक्ष करून दाखवली. बाभूळतेल येथील तरुण शेतकरी अक्षय महाले यांनी ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक करून दाखवत उपस्थितांचे लक्ष वेधले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी पर्यवेक्षक आदिनाथ सपाटे यांनी केले, तर आभार दत्तात्रय पेदे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी पर्यवेक्षक विशाल दांगोडे, किरण भुजबळ, ज्ञानेश्वर कोल्हे, राजेंद्र थोरात, कृष्णा सरोवर, पुनाजी देशमुख, बळीराम ठेंगडे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी कृषी सहाय्यक विद्या पालवे, अर्चना सोनवणे, सोनाली महाले, हेमलता मुळे, राधा निकाळे, ऋतुजा होरने, अंजली सोनवणे, सविता पंडुरे, वनिता खडके यांची उपस्थिती होती. तसेच पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसूळ आणि ट्रेनर बाळू चव्हाण, विविध बचत गटांचे प्रतिनिधी, सूर्या, साई आणि जगदंबा शेतकरी गटांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पोषण आहार घोटाळ्याच्या विरोधात मनिषा पोळ यांचे उपोषण; पाचव्या दिवशीही संघर्ष सुरूच

## शाळेतील आहार विक्रीचा आरोप; सखोल चौकशी व लेखी आश्वासनाची मागणी

**बदलापूर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पोषण आहार योजनेत झालेल्या घोटाळ्याच्या विरोधात वांगणी येथील समता महिला बचत गटाच्या अध्यक्षा मनिषा पोळ यांचे आमरण उपोषण आज पाचव्या दिवशीही अंबरनाथ तहसील कार्यालयासमोर सुरूच आहे. मौनी बाबा विद्यालयाने श्रमजीवी महिला बचत गटाच्या माध्यमातून पोषण आहाराचे धान्य बेकायदेशीररीत्या विकले, असा गंभीर आरोप करत मनिषा पोळ यांनी यंत्रणेतील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश केला आहे. जुलै महिन्यात शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार न दिल्याचा ठपका असतानाही संबंधित शाळा प्रशासनाने बचत गटाविरोधात कारवाईस नकार दिला. उलट समता बचत गटावरच चोरीचा आरोप केला गेला, असे पोळ यांचे म्हणणे आहे. या अन्यायाविरुद्ध त्या गेल्या अनेक महिन्यांपासून लढा देत असून लेखी आश्वासन आणि सखोल चौकशी होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

या आंदोलनाला सामाजिक, राजकीय संघटनांचा तसेच स्थानिक नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.




# रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता? बाभुळवाडी-वडजाई-सौंदाणे रस्त्याची दयनीय अवस्था; लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

**धुळे । उमाकांत अहिरराव**

धुळे तालुक्यातील बाभुळवाडी, वडजाई व सौंदाणे रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. संपूर्ण रस्त्यावर इतके मोठे खड्डे झाले आहेत की, 'रस्त्यात खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता?' असा प्रश्न प्रवाशांना सतावत आहे. पावला-पावलावर खड्डे निर्माण झाल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी आणि विद्यार्थ्यांची वर्दळ असते. वडजाई हे परिसरातील प्रमुख व्यापारी केंद्र असून, पाच ते सहा गावांचा संपर्क याच रस्त्यावरून होतो. शिक्षणासाठी धुळे शहरात ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांचीही संख्या लक्षणीय आहे. मात्र रस्त्याच्या अत्यवस्थेमुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



'क्रियाशील' असे स्वतःला म्हणवणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या कार्यतत्परतेवर स्थानिक ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. बाभुळवाडी ते वडजाई रस्त्याची दुरवस्था इतकी का झाली? असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.वाहनचालक मेटाकुटीला आले असून, प्रवास दुरापास्त झाला आहे. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी बाभुळवाडी, वडजाई, सौंदाणे परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# रुग्णांच्या सेवेसाठी वाढदिवस महिला पत्रकार कुमुदिनी भोयर यांच्या उपक्रमाचे कौतुक

**मूल । प्रतिनिधी**

सुख-दुःखाच्या वाटचालीत इतरांच्या वेदनांमध्ये स्वतःचा आनंद मिसळणं, हीच खऱ्या अर्थाने माणुसकी आहे,याचे जिवंत उदाहरण मूल येथील महिला पत्रकार कुमुदिनी भोयर यांनी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी घालून दिले. उपजिल्हा रुग्णालय, मूल येथे दाखल रुग्णांना त्यांनी फळे व बिस्किटांचे वाटप करून आपला वाढदिवस समाजसेवेत अर्पण केला.रुग्णांना मानसिक दिलासा मिळावा आणि त्यांच्या उपचारांमध्ये पोषणात्मक हातभार लागू, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी रुग्णांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि त्यांच्या आशीर्वादातील ओलावा उपस्थितांच्या मनाला भावून गेला.



या सामाजिक उपक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. ज्येष्ठ पत्रकार विजय प्रभाकर सिद्धावार, माजी नगर परिषद उपाध्यक्ष प्रवीण मोहुर्ले, माजी नगरसेवक प्रशांत समर्थ, निलेश रॉय, सामाजिक कार्यकर्ते विवेक मुतलवार, पत्रकार अमित राऊत, सतिश राजूरवार, धर्मेंद्र सूत्रपवार, नितेश मकलवार, संदीप मोहबे, आशुतोष सादमवार, बबलू सय्यद, राकेश मोहुर्ले, जिजाऊ ब्रिगेड च्या अध्यक्षा संजीवनी वाघरे, स्त्रीशक्ती च्या कल्पना मेश्राम आदी यावेळी उपस्थित होते.

या उपक्रमातून सामाजिक जबाबदारीची जाणीव जपणाऱ्या पत्रकारितेचा एक सकारात्मक चेहरा समोर आला असून, इतरांनाही प्रेरणा मिळावी असा संदेश यातून प्रसारित झाला आहे. कुमुदिनी भोयर यांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# एचएससी परीक्षेत प्रतीक्षा झिंजाडे प्रथम


## ८६.५० टक्क्यांसह गाठला यशाचा शिखर

**सोलापूर । प्रतिनिधी**

प्रवरा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, लोणी येथील एचएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, पोथरे (ता. करमाळा) येथील विद्यार्थिनी प्रतीक्षा संतोष झिंजाडे हिने ८६.५० टक्के गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

प्रतीक्षा ही सध्या लोणी (ता. राहाता) येथील प्रवरा कन्या विद्या मंदिरात विज्ञान शाखेत बारावीचे शिक्षण घेत आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिक्षकांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे.

पोथरे गावातही तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून ग्रामस्थांच्या वतीने तिला पेढा भरवून गौरवण्यात आले. मेहनतीने यश मिळवणाऱ्या प्रतीक्षाचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे-संतोषसिंह रावत

## गेल्या तीन वर्षांतील प्रशासकीय मनमानी थांबवण्यासाठी निवडणुका महत्त्वाच्या - काँग्रेस नेत्यांचे आवाहन

**मुल । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आगामी चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले असून, त्यानंतर काँग्रेस पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे.

काँग्रेस नेते, सी.डी.सी.सी. बँकेचे अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोषसिंह रावत यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षांपासून निवडणुका न झाल्याने प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मनमानी कारभार करत होते. नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष होत होते, तर शेतकऱ्यांची कामे रखडत होती. हे सर्व थांबवायचं असेल, तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींना पुन्हा संधी देणे गरजेचे असल्याचे रावत यांनी स्पष्ट केले.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत निवडणुकांच्या वेळापत्रकाबाबत माहिती दिली. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०२२ पूर्वी ओबीसींना मिळालेलं आरक्षण कायम



ठेवतच चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्यात येणार आहेत.

या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या नगर व ग्रामीण पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी युद्धपातळीवर तयारीला लागावे, स्थानिक प्रश्नांवर भर द्यावा आणि लोकांमध्ये पक्षाची भूमिका पोहोचवावी, असे संतोषसिंह रावत यांनी आवर्जून सांगितले.

## शक्तीपीठ महामार्गाला नागरीकांचा विरोध?

# पर्यावरणाच्या नावाखाली शक्तीपीठ विकासाच्या महा मार्गात अडथळा आणणाऱ्या ना फटके दिले जातील

## खासदार नारायण राणे यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वादळ निर्माण होण्याची शक्यता



**मुंबई । विराम पवार**

राज्य सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प नागपूर ते गोवा असा प्रस्तावित 'शक्तीपीठ महामार्ग' सध्या संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेचा आणि वादाचा विषय ठरत आहे. एकीकडे विकासाच्या नावावर या प्रकल्पाला वेग दिला जात असताना, दुसरीकडे या महामार्गाविरोधात स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थ रस्त्यावर उतरत आहेत. विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यात याबाबत जनतेत प्रचंड अस्वस्थता असून, अनेक तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे पोहोचल्या आहेत.

याच पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री आणि सध्या भाजपचे खासदार नारायण राणे यांनी सिंधुदुर्गातील सावंतवाडी येथे जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि माध्यमांसमोर आपली स्पष्ट भूमिका मांडली. त्यांच्या भाषणाने पुन्हा एकदा राजकीय वादळ निर्माण केलं आहे. सावंतवाडीत आयोजित बैठकीत बोलताना राणे म्हणाले, शक्तीपीठ महामार्ग हा जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. काही लोक याला विरोध करत आहेत.

पण विरोधासाठी फक्त विरोध करणाऱ्यांना योग्य उत्तर दिलं जाईल. विकासाच्या मार्गात अडथळा आणणाऱ्यांना आम्ही फटके देऊ. त्यांनी पुढे असंही नमूद केलं की, जंगलं कोणी राखत नाहीत. ती आपोआप राखली जातात. वन्यजीव त्यांचं संरक्षण करतात. त्यामुळे पर्यावरणाच्या नावावर विकास रोखण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही.

# झाप ग्रामपंचायतीत 'सरपंच आपल्यादारी' कार्यक्रम उत्साहात संपन्न सरपंच एकनाथ दरोडा यांच्या नेतृत्वाखाली जनतेशी थेट संवाद

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

झाप ग्रामपंचायत हद्दीतील झाप, चिंचवाडी, भोकरीचापाडा, नवापाडा या गावांमध्ये 'सरपंच आपल्यादारी' कार्यक्रम नुकताच पार पडला. लोकनियुक्त सरपंच एकनाथ दरोडा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपक्रमात ग्रामस्थांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यात आल्या.

कार्यक्रमात घरकुल योजना, रोजगार हमी योजना, संजय गांधी निराधार योजना, नवीन घरकुल सर्वेक्षण, रेशन कार्ड व जॉब कार्ड आदी योजनांची माहिती देत त्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. गावपातळीवरील योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धार या उपक्रमात व्यक्त झाला.या प्रसंगी ग्रामविकास अधिकारी अमोल भोये, ग्रामपंचायत सदस्य विलास बागूल, महेंद्र गवारी, कृषी सहाय्यक भोये साहेब, वनरक्षक आव्हाड दादा, घरकुल अभियंता पंकज राऊत, अंगणवाडी सेविका प्रमिला करपट, सविता दरोडा, हिरा पाडेकर, अंकिता तेलवडे, रुक्मिणी पुराने, यमुना राठोड, बरतन, आशा स्वयंसेविका सोनाली तेलवडे, सपना वातास, पेसा मोबिलायझर कल्पना वड, रोजगार सेवक युवराज गवारी, कृष्णा बेडकोळी यांची उपस्थिती लाभली.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .